0 9 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या कार्यावर आधारित चित्ररथाचे स्वागत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित चित्ररथाची निर्मिती केली आहे. या चित्ररथाचे स्वागत आज शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर करण्यात आले.



कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावरील चित्ररथासमवेत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, प्रकाश गायकवाड, रामचंद्र पवार यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घेण्यासाठी प्रेरित व्हावे, हेच त्यांच्याविषयीच्या चित्ररथाचे खरे प्रयोजन असल्याचे सांगितले.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा, कला, संस्कृती आदी सर्वच क्षेत्रांत उत्तुंग कार्याचा डोंगर उभा केला आहे. कोल्हापूरचे ते खरे भाग्यविधाते आहेत. त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभरात नावाजले जाते. या चित्ररथावर त्यांच्या कार्याची काही क्षणचित्रे पाहावयास मिळतात; पण त्याही पलीकडे त्यांचे कार्य आहे. ते या निमित्ताने विद्यार्थ्यांनी जाणून घेणे अभिप्रेत असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
09 MAR 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावरील चित्ररथासमवेत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, आदी उपस्थित होते.

# शाहूंच्या चित्ररथाचे विद्यापीठात स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घेण्यासाठी प्रेरित व्हावे, हेच त्यांच्याविषयीच्या चित्ररथाचे खरे प्रयोजन आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथाची निर्मिती केली आहे. या चित्ररथाचे विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर स्वागत करण्यात आले. संपूर्ण दिवसभर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह सर्वच घटकांनी, अभ्यागतांनी या चित्ररथावरील प्रदर्शनाची पाहणी केली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सोमनाथ पवार, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
09 MAR 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवस्पंदनमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचे वर्चस्व

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात अखेरच्या दिवशी तंत्रज्ञान अधिविभागाने विविध क्रीडा प्रकारांतील वर्चस्व सिद्ध केले. कबड्डीसह क्रिकेट आणि रस्सीखेच या स्पर्धांमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघांनी विजेतेपद मिळविले.

कबड्डी स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाच्या पुरुष व महिला संघांनी विजेतेपद मिळविले. पुरुष गटात क्रीडा आणि एमबीए अधिविभागांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविले. महिला गटात गणित आणि पर्यावरणशास्त्र अधिविभागांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या अंतिम दिवसाच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विजेत्या खेळाडूंसह डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड यांच्यासह अधिकारी, संयोजन समितीचे सदस्य.

क्रिकेटमध्ये पुरुष गटात तंत्रज्ञान, क्रीडा आणि गणित अधिविभागांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळवले. महिला गटात गणित, इतिहास आणि नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. रस्सीखेच स्पर्धेत पुरुष गटात तंत्रज्ञान, एमबीए आणि रसायनशास्त्र यांनी तर महिला गटात नॅनो सायन्स व तंत्रज्ञान, गणित आणि इलेक्ट्रॉनिक्स या अधिविभागांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले.

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे चार ते सात मार्चअखेर झालेल्या स्पर्धेच्या अंतिम दिवसाचा पारितोषिक वितरण समारंभ वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते झाला. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. शिवलिंगप्पा सपली, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. एन. डी. पाटील, डॉ. प्रशांत पाटील, एन. आर. कांबळे, डॉ. आय. एच. मुल्ला, सुभाष पोवार, डॉ. सचिन पाटील, सुचय खोपडे, डॉ. नवनाथ वळेकर, डॉ. अण्णा गोफणे, डॉ. क्रांतिकुमार मोरे, धीरज पाटील यांच्यासह आनंदा तळेकर, सुनील देसाई, क्रीडा अधिविभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पंच म्हणून विशांत भोसले, विक्रम कोंढावळे, राजेश कोळी, संतोष खाडे, विशाल हिलगे, योगेश दळवी, युवराज साबळे, अमर पाटणकर, प्रमोद सामुद्रे, उदय करवडे, विद्यापीठातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

0 9 MAR 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान अधिविभागाचे वर्चस्व

## शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात अखेरच्या दिवशी तंत्रज्ञान अधिविभागाने विविध क्रीडा प्रकारांतील वर्चस्व सिद्ध केले. कबड्डीसह क्रिकेट व रस्सीखेच स्पर्धांमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघांनी विजेतेपद मिळविले.

कबड्डीत तंत्रज्ञान अधिविभागाच्या पुरुष व महिला संघांनी विजेतेपद मिळवले. पुरुष गटात क्रीडा व एमबीए अधिविभागांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवले. महिला गटात गणित व पर्यावरणशास्त्र अधिविभागांनी द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले.

क्रिकेटमध्ये पुरुष गटात तंत्रज्ञान, क्रीडा व गणित अधिविभागांनी तीन क्रमांक पटकावले. महिला गटात गणित, इतिहास आणि नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. रस्सीखेच स्पर्धेत पुरुष गटात तंत्रज्ञान, एमबीए व रसायनशास्त्र यांनी, तर महिला गटात नॅनोसायन्स व तंत्रज्ञान, गणित आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागांनी पहिले तीन क्रमांक मिळवले.

स्पर्धेच्या अंतिम दिवसाचा पारितोषिक वितरण समारंभ वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. शिवलिंगप्पा सपली, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण पाटील यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सव पारितोषिक वितरणप्रसंगी विजेत्या खेळाडूंसह वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड आदी.

0 9 MAR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या अंतिम दिवसाच्या पारितोषिक वितरण प्रसंगी विजेत्या खेळाडूंसह वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड उपस्थित होते.

# शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात तंत्रज्ञान अधिविभागाचे वर्चस्व

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात अखेरच्या दिवशी तंत्रज्ञान अधिविभागाने विविध क्रीडा प्रकारांतील आपले वर्चस्व सिद्ध केले. कबड्डीसह क्रिकेट आणि रस्सीखेच या स्पर्धांमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघांनी विजेतेपद मिळविले.

कबड्डी स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाच्या पुरूष व महिला संघांनी विजेतेपद मिळविले. पुरूष गटात क्रीडा आणि एमबीए अधिविभागांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. महिला गटात गणित आणि पर्यावरणशास्त्र अधिविभागांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविले.

क्रिकेटमध्ये पुरूष गटात तंत्रज्ञान, क्रीडा आणि गणित अधिविभागांनी अनुक्रमे तीन क्रमांक पटकावले. महिला गटात गणित, इतिहास आणि नॅनोसायन्स व तंत्रज्ञान या अधिविभागांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. रस्सीखेच स्पर्धेत पुरूष गटात तंत्रज्ञान, एमबीए आणि रसायनशास्त्र यांनी तर महिला गटात नॅनोसायन्स व तंत्रज्ञान, गणित आणि इलेक्ट्रॉनिक्स या अधिविभागांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले.

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाच्या वतीने ४ ते ७ मार्च या कालावधीत पार पडलेल्या या स्पर्धेच्या अंतिम दिवसाचा पारितोषिक वितरण समारंभ वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ दत्तात्रय गायकवाड, डॉ. शिवलिंगप्पा सपली आणि क्रीडा संचालक डॉ शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 MAR 2024

पुण्यनगरी

# कौशल्ययुक्त युवापिढी निर्माण होण्याची आवश्यकता : पाटील




मुरगूड : परिषदेत मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू पी. एस. पाटील.

मुरगूड : स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्याला बहुविद्या शाखीय ज्ञान, अनुभव व कौशल्य प्राप्त होण्याची गरज आहे. वेगाने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीमध्ये बहुविद्या शाखीय कौशल्ययुक्त युवापिढी निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आयोजित बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेत अभ्यासक्रमाव्दारे कौशल्यवृद्धी एक बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ अर्जुन कुंभार होते. हैदराबाद युनिव्हर्सिटीचे डॉ. प्रकाश कोपार्डे, शिवराज एज्यु.चे कार्यवाह आण्णासाहेब थोरवत, दूधसाखर महाविद्यालय बिद्रीचे प्राचार्य डॉ. संजय पाटील, देवचंद कॉलेजच्या प्राचार्या जी. डी. इंगळे यांच्या उपस्थितीत परिषदेला सुरुवात झाली. यावेळी डॉ. जयंत कळके, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. माणिक पाटील यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. उदय शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. विनोद प्रधान यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2024
लोकमत

# परसाईंचे साहित्य समाज सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण : माहेश्वरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : हिंदीचे प्रसिद्ध लेखक हरिशंकर परसाई यांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीवर केलेली व्यंगात्मक फटकेबाजी ही कालातीत असून, त्यांचे समग्र साहित्य हे समाज सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत प्रसिद्ध व्यंग समीक्षक डॉ. सुरेश माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

परसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्यावतीने वि. स. खांडेकर भाषा भवन येथे एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र.-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. डॉ. ए. एम. सरवदे यांनी प्रास्ताविक केले.

प्रथम सत्रात विषयतज्ज्ञ वृषाली मांद्रेकर (गोवा) यांनी व्यंग्य साहित्याची व्याप्ती स्पष्ट केली. अध्यक्ष डॉ. सुनील बनसोडे (जयसिंगपूर) यांनी परसाई यांचे साहित्य व्यक्ती व समाजाला दिशा देणारे असल्याचे सांगितले. द्वितीय सत्रात विषय तज्ज्ञ डॉ. अरुण गंभिरे (उस्मानाबाद) यांनी मनोगत व्यक्त केले. समापन सत्रात डॉ. अर्जुन चव्हाण म्हणाले, परसाईंना त्यांच्या व्यंगात्मक लेखनामुळे मारहाणही झाली. त्यांच्या लेखनाने सामान्य हिंदी वाचकांची संख्या वाढविली.